**खटला क्र. ५२५/पीडब्ल्यु/२०२३** **निशाणी क्र. ३८ क्रमशः**

साक्षीदार क्र. १ शपथेवर सुरूः—

**उलटतपासणी ॲड. श्री. संजय रा. कोल्हापुरे आरोपी क्र. १ व ३ करिता** :—

११. सन २०१६ मध्ये मी खाजगी सुरक्षारक्षक म्हणुन काम करत होतो. मागील सात ते आठ वर्षांपासुन मी खाजगी सुरक्षारक्षक म्हणुन काम करत आहे. मला प्रति महिना रू. ९,०००/— वेतन मिळते. मला मिळणाऱ्या मासिक वेतनातुन कोणत्याही रक्कमेची बचत होत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी सन २०१६ मध्ये भाऊयाच्या खोलीमध्ये राहत होतो. मी सन २०१६ पासुन भाऊयाच्या रूममध्ये राहत आहे. माझ्याकडे पैसे नसल्याने मी स्वतःचे घर घेवु शकलो नाही. माझ्याकडे स्वतःचे घर घेण्याइतके पैसे नसल्याने मी ते घर घेवु शकलो नाही.

१२. अजय धोंडु पवार हे माझे नात्याने साडु आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्याकडे पैसे नसताना देखील मी माझ्या साडुला घर बघण्यासाठी सांगितले होते. मी प्रसन्ना कुळे यास ओळखतो. प्रसन्ना कुळे हा माझ्या साडुचा मित्र असल्याने माझा व त्याचा परिचय होता. प्रसन्ना कुळे हे इस्टेट एजंटचे काम करत होते. हे म्हणणे खरे आहे की, मी साडु अजय पवार यांना रूम पाहण्यास सांगितल्यानंतर त्यांनी ते काम प्रसन्ना कुळे याच्यावर

सोपवले होते. हे म्हणणे खरे आहे की, प्रसन्ना कुळे हे मला प्रभादेवी येथील साईनिकेतन एस.आर.ए. बिल्डींग नं. ६ मधील रूम दाखवणार होते. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील इमारतीमध्ये असलेला रूम सामान्य लोकांना विकत घेता येतात किंवा कसे याबाबतची मला माहिती नाही. मी झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील इमारतीमध्ये असलेला रूम विकत घेतात किंवा कसे याबाबत चौकशी केली होती. (साक्षीदाराने स्वतःहुन असे सांगितले की, त्याने त्याबाबत चौकशी केली असता संजय कांबळे, संदिप सुर्वे यांनी त्यास अशी माहिती दिली होती की, परिशिष्ट क्र. २ मध्ये नाव समाविष्ट करून ती रूम देता येवू शकते.) मी प्रसन्ना कुळे यास झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील इमारतीमध्ये असलेला रूम विकत घेतात किंवा कसे याबाबत चौकशी केली होती. प्रसन्ना कुळे याने मला झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील इमारतीमध्ये असलेला रूम कायद्याने विकत घेता येत नाही असे सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील इमारतीमध्ये असलेला रूम कायद्याने विकत घेता येत नाही या बाबीची माहिती मला सुरूवातीपासुन होती.

**बचाव पक्षाच्या विधीज्ञांच्या तोंडी विनंतीवरून उलटतपास दिनांक ३१/०८/२०२४ पर्यंत तहकुब करण्यात येत आहे.**

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

स्वाक्षरी/—
**(वैभव व. कुलकर्णी)**
**अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,**
**५ वे न्यायालय, दादर, मुंबई.**

**दिनांक : २१/०८/२०२४.**